C314

वाचा :- १. या संचालनालयाचे कार्यालयीन आदेश क्र.३६, दिनांक ३०/०७/२००९.
२. संचालनालयाचे पत्र क्र.स्था-१८ /ब/ लेपअ / अधिकार व कर्तव्य / अहवाल / २०६७, दिनांक ०२/१२/२०१३.

---

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय,**
**महाराष्ट्र राज्य, कोंकण भवन, ६ वा माळा,**
**नवी मुंबई ४०० ६१४**
**दिनांक :-**

विषय :- जिल्हा परिषद / पंचायत समिती यांचे लेखापरीक्षणाबाबत.

**कार्यालयीन आदेश क्रमांक** ७२ **दिनांक :** 15 SEP 2015

उपरोक्त वाचा मधील आदेशांतील निर्देशांमध्ये अंशत: बदल करून जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या सन २०१४-२०१५ पासूनच्या लेखापरीक्षणाबाबत खालीलप्रमाणे सुधारीत आदेश निर्गमित करण्यात येत आहेत-

वाचा क्र. १ च्या आदेशान्वये " जिल्हा परिषदेच्या वित्त व बांधकाम, सिंचन (पाणी पुरवठा विभागासह) या विभागांचे लेखापरीक्षण पथक प्रमुख म्हणून उपमुख्य लेखापरीक्षक राहतील व या विभागांच्या लेखापरीक्षणावर संनियंत्रण व अहवालाचे अंतिमीकरण सहमुख्य लेखापरीक्षक करतील व उर्वरित विभागांचे लेखापरीक्षण पथक प्रमुख लेखापरीक्षा अधिकारी / सहाय्यक लेखापरीक्षा अधिकारी राहतील " असे निर्देश आहेत.

त्या ऐवजी " जिल्हा परिषदांकडील वित्त, बांधकाम, सिंचन (पाणी पुरवठा विभागासह) या विभागांचे लेखापरीक्षण पथक प्रमुख सहाय्यक संचालक राहतील तसेच संनियंत्रण व अंतिमीकरण विभागीय सह संचालक करतील. जिल्हा परिषदेच्या उर्वरित विभागांचे लेखापरीक्षण पथक प्रमुख **लेखापरीक्षा अधिकारी / सहाय्यक लेखापरीक्षा अधिकारी** राहतील. तसेच संनियंत्रण व अहवाल अंतिमीकरण सहाय्यक संचालक करतील." असे वाचावे.

तसेच वाचा क्र.२ च्या आदेशामधील अ.क्र. ४ नुसार " पंचायत समित्यांबाबत साधारण ५०% पंचायत समित्यांच्या लेखापरीक्षणाचे पथक प्रमुख हे सहाय्यक संचालक व उर्वरित पंचायत समित्यांच्या लेखापरीक्षणाचे पथक प्रमुख म्हणून लेखापरीक्षा अधिकारी हे राहतील " असे निर्देश आहेत.

त्या ऐवजी " पंचायत समित्यांच्या लेखापरीक्षणाचे पथक प्रमुख हे **लेखापरीक्षा अधिकारी / सहाय्यक लेखापरीक्षा अधिकारी** हे राहतील व या लेखापरीक्षणाबाबत संनियंत्रण व अहवाल अंतिमीकरण सहाय्यक संचालक करतील " असे वाचावे.

इतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लेखापरीक्षण कार्यपध्दतीबाबत यापूर्वीच्या आदेशातील निर्देश कायम राहतील.

या आदेशाची तात्काळ अंमलबजावणी व्हावी.

(का.मा.बिधाते)
संचालक,
स्थानिक निधी लेखापरीक्षा
महाराष्ट्र राज्य

प्रत माहिती व कार्यवाहीस्तव :-
१. सह संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, कोकण / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर.
२. सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, सर्व .
३. कार्यालयीन नस्ती.

Surekha lenovo hall asa aadesh १००९१५